CNR NO.MHRT05-0000430-2017

**रे.मु.नं. ६१ सन २०१७ मधील निशाणी ३९ वरील आदेश.**
**(पारीत दिनांक २५/०३/२०२१.)**

**१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये दाखल केला आहे.

**२.** वादीचे कथन की, प्रतिवादी क्र. १ याने दिनांक १०/४/२०१२ रोजी वादीबरोबर नोंदणीकृत साठेखत करुन त्याचे मालकीची मौजे वेरळ येथिल भूमापन क्र. ५६३अ१ क्षेत्र ०–६३–८ हेक्टर आर  आकार रुपये ५.१० पैसे, पैकी ०–०७–०० आर क्षेत्र रक्कम रुपये २,८०,०००/– यास खरेदी देण्याचे ठरविले.  परंतु त्यानंतर साठेखतात नमूद मिळकतीचे वादीचे नावे खरेदीखत करुन दिले नाही. त्यामुळे साठेखतावरुन खरेदीखत करणेसाठी वादीस प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले. दरम्यान प्रतिवादी क्र. १ ने दिनांक १०/१२/२०१९ रोजी दिपक नारायण पोफळकर यांना दावा मिळकतीपैकी २.९४ गुंठे एवढया जागेचे खरेदीखत करुन दिले.  ते नोंदणीकृत असून त्यावरुन फेरफार क्रमांक २३८६ मंजूर होवून दिपक नारायण पोफळकर यांचे नाव दावा मिळकतीच्या सात बारा सदरी दाखल झाले आहे. त्यामुळे दाव्यात तांत्रीक अडचण राहू नये म्हणून दिपक पोफळकर यांना या दाव्यात प्रतिवादी क्र. ६ म्हणून समाविष्ठ करण्यास परवानगी द्यावी व अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादी  यांनी सदर अर्जावर म्हणणे देवून सदर खरेदीखताचा दाव्यावर कोणताही परिणाम होणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**४.** मी वादी व प्रतिवादींतर्फे सन्माननिय विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनांच्या अनुषंगाने युक्तीवाद केला.  प्रस्तुत अर्जाच्या निर्णयासाठी खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यांचे कारणांसहीत निष्कर्ष नोंदविले आहेत ते खालीलप्रमाणे –

| | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी दिपक पोफळकर यांना दाव्यात  प्रतिवादी क्र. ६ म्हणून सामील करणेचा आदेश होउन मिळणेस पात्र आहे काय ? | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**५.** मी दाव्याचे अवलोकन केले. मौजे वेरळ येथिल भूमापन क्रमांक ५६३अ१ या मिळकतीपैकी ०८ आर क्षेत्र याच्या पूर्वेस मुंबई गोवा महामार्ग, पश्चिमेस सदर गट नंबर ५६३ ची हद्दी, उत्तरेस याच गट नंबर पैकी दिपक पोफळकर यांना खरेदी देणे ठरविलेली ०३ गुंठे क्षेत्र मिळकत व दक्षिणेस याच गट नंबरचे उर्वरीत क्षेत्र ही दावा मिळकत आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज याचे मी काळजीपूर्वक अवलोकन केले. दावा मिळकत म्हणून चतुःसिमापूर्वक वर्णन केलेल्या मिळकतींमधीलच २.९४ गुंठे क्षेत्राचे प्रतिवादी क्र. १ ने दिपक पोफळकर यांना दिनांक १०/१२/२०१९ रोजी खरेदीखत करुन दिले असे वादीचे स्पष्ट कथन नाही. यावरुन प्रतिवादी क्र. १ च्या नावे गट नंबर ५६३अ१ या मिळकतीच्या सात बारा सदरी असणा-या एकुण क्षेत्रापैकी २.९४ गुंठे क्षेत्र दिपक पोफळकर यांना दिले असल्याचे दिसून येते. दिपक पोफळकर यांना खरेदी दिलेले क्षेत्र व दावा मिळकत हे वेगवेगळे असल्यामुळे दिपक पोफळकर यांना प्रस्तुत दाव्यात सामील करण्याची आवश्यकता नाही. वादीची त्यांचे विरुध्द कोणतीही मागणी नाही. यादृष्टीने वादीस दावा दुरुस्तही करावयाचा नाही. त्यामुळे वादीने मागणी केलेली दाद नामंजूर होणेस पात्र आहे. या निष्कर्षाप्रत मी आले आहे. म्हणून मी प्रश्न क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देवून प्रश्न क्रमांक २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

( खुल्या न्यायालयात पारीत व घोषित केले.)

Pratibha Prabhakar Khape
Digitally signed by Pratibha Prabhakar Khape
Date: 2021.03.25 17:16:22 +0530

दिनांक – २५/३/२०२१. श्रीमती पी.एस.जाधव

ठिकाण – खेड. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर खेड.

The contents of PDF file of order / Judgments are as per the original file.

Name of the Court :- Civil Judge, J.D., Khed, Tal. Khed, Dist.Ratnagiri.

Name of Stenographer :- R.K.Sangare.
Name of the P.O. :- Smt. P.S.Jadhav / Smt.P.P.Khape
Date of Pronouncement :- 25-03-2021
Order signed on :- 25-03-2021
Order uploaded on :- 25-03-2021